MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात


यावेळी बीड शहरामध्ये हजारो घरकुल हे बोगस पद्धतीने सध्या फक्त कागदावर झालेली दिसून येत आहेत तर रमाई आवास योजनेचा घरकुलचा बीड नगर परिषदेचा चार्ज अखिल फारोकी कडून मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी काढून घेत अखिल फारोकी ला चपरा दिली होती परंतु आता नगररचनाकारचा चार्ज मुख्याअधिकारी यांनी दिला आणि अखिल फारोकीचा नंगानाच करण्याची जसं काय परमिशन दिली आहे अशी परिस्थिती सध्या बीड नगर परिषदेमध्ये पाहायला मिळत आहे शहरातील सामान्य नागरिकांना यावेळी आता सलीम ट्रेसर नंतर अखिल फारुकीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यामध्ये बीड शहरातील गुंठेवारी लेआउट बांधकाम परमिशन साठी चकरा मारून आर्थिक मानसिक त्रास होत असतानाच मात्र अखिल फारुकीचे निकटवर्ती माणसं हे आलेल्या लोकांना अक्षरशः लचके तोडण्यासाठी सज्ज आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३१५ | बुधवार दि.०७ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -315 | WEDNESDAY DT.07 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# नगरपरिषदेचा अभियंता अखिल फारुकीचे पाचही बोटं तुपात अगोदर बीड नगर परिषदेत गुत्तेदार रोजंदारीवर अभियंता परमनंट अभियंता नगररचनाकारचा अतिरिक्त ट्रेसर चा कार्यभार?





**अखिल फारुकीच्या खासगी ऑफिसमध्ये नोटाची गंगा वाहू लागली लोकांच्या खिशावर अखिल फारुकीचे लोक डल्ला मारू लागले?**

**अखिल फारोकीने दिलेल्या गुंठेवारी लेआउट बांधकाम परमिशन याची सखोल चौकशी होणे गरजेचे?**

**अखिल फारोकी कोणत्या राजकीय नेत्यांचा किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आशीर्वाद?**

**बीडच्या नगर परिषदमध्ये अगोदर गुत्तेदार नंतर रोजंदारीवर अभियंता, परमनंट अभियंता, नगर रचनाकार विभागात ट्रेसर म्हणून अखिल फारुकींना अतिरिक्त कारभार खूप मोठा प्रवास आर्थिक तडजोडीमध्ये मालामाल?**

**बीड नगर परिषदेचा अभियंता अखिल फारोकी वादग्रस्त?अनेक बांधकाम परवाने अवैधरीत्या दिले?**

**बीड नगरपरिषद अंतर्गत बीड शहरातील अनेक अवैधरित्या बांधकाम उभा राहत आहेत अखिल फारुकीच्या आशीर्वादाने?**

**बीड शहरात फक्त कागदावर हजारो घरकुल अखिल फारोकीच्या सहीने?**

**अखिल फारुकी म्हणजे बीड नगरपरिषदला चिटकून बसलेला वादग्रस्त अभियंता अखिल फारुकीने या अगोदर बीड शहरातील विविध विकास कामांमध्ये सुद्धा खूप मोठा भ्रष्टाचार केलेला असून याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे?**

**बीड नगर परिषदेच्या विविध कामाचे अखिल फारोकीने केलेले अंदाजपत्रक मेजरमेंट पुस्तक( एम बी) याची सखोल चौकशी होणे गरजेचे.?**

**बीड नगर परिषदेच्या अखिल फारोकी अभियंता मोठ्या मोठ्या राजकीय नेत्यांच्या नावाने दबाव तंत्राचा वापर करून अधिकाऱ्यांना व बीड शहरातील जनतेला त्रास देणाऱ्या अखिल फारुकीचे कारनामे पुढील अंकांमध्ये वाचा.?**

बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमधील नगर रचनाकार विभागात अखिल फारुकींना अतिरिक्त पदाचा कारभार देण्यात आला आहे बीड नगर परिषदेच्या अ वर्ग दर्जा असल्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये लेआउट बांधकाम परवाना गुंठेवारी याच्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून नगरपालिकेला नगरपालिकेच्या अनेक बांधकाम परवान्यामध्ये गुंठेवारी मध्ये लेआउट मध्ये नगरपरिषदेच्या तिजोरी मध्ये जाणारा पैसा हा अखिल फारुकीच्या जवळच्या लोकां च्या खिशात जाऊ लागला आहे तर संबंधित बीड शहरातील लोक हे टक्केवारी देऊन आपले काम करत आहेत याचाच एक भाग म्हणून आज त्या परिस्थितीत पाहिले गेले तर बीड नगर परिषदेचा नगररचनाकार विभागाचा अतिरिक्त चार्ज अखिल फारुकी या व्यक्तीकडे आहे या व्यक्तीने आज पर्यंत खूप मोठा भ्रष्टाचार केलेला असतानाच मात्र यावेळी आता अखिल फारोकी ने भ्रष्टाचाराचा घाटच घातला आहे तर या अगोदर बीड नगर परिषदेचा गुत्तेदार ते रोजंदारीवर अभियंता आणि आता परमनंट अभियंता पद असताना सुद्धा अतिरिक्त नगर रचनाकार पदाचा अतिरिक्त कारभार हा कोणाच्या आशीर्वादाने घेऊन भ्रष्टाचार नंगानाचपणे करून दाखवत असताना बीडकराना अखिल फारुकीचा त्रास सहन करावा लागत आहे.

रमाई आवास योजना घरकुल असेल किंवा अन्य बीड शहरातील वेगवेगळे काम असतील याचा खूप मोठा भ्रष्टाचार अखिल फारोकी ने या अगोदर सुद्धा केलेला आहे रमाई आवास योजना बीड शहरातील अनेक गोरगरिबांच्या घराचा पैसा अखिल फारोकी व अखिल फारुकीच्या हाताखाली काम करणारे इतर लोकांनी खाल्ला म्हणून

# केंद्रिय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला भरीव मदत मिळाली, विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी, हिंमत असेल तर उघडा डोळे, बघा निट – प्रवक्ते राम कुलकर्णी

बीड /प्रतिनिधी

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला एक लाख कोटी रूपये मिळाल्याचा दावा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला असुन काहीच मिळालं नाही असं म्हणत विरोधक केवळ राजकिय स्वार्थापोटी ओरड करत असल्याची टिका त्यांनी केली. वाढवण बंदराला ७६ हजार कोटी तर रेल्वे प्रकल्पासाठी १५ हजार कोटी एवढेच नव्हे तर मराठवाड्यातले सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ६०० कोटी रूपायाची आर्थिक तरतुद असल्याचे सांगत उघडा डोळे, बघा निट असं म्हणत विरोधकांना त्यांनी टोला मारला.

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर बोलण्यासाठी प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांची पत्रकार परिषद पक्षाच्या संघर्ष योद्धा जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कामगार मोर्चाचे संयोजक ओमप्रकाश गिरी यांची उपस्थिती होती.

केंद्र सरकारने सामान्य माणसाचं हित आणि देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला. उत्पादन वाढ करताना गरिब माणसाचा विचार ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतुन एक कोटी घरं, गरिबाच्या मुलांनी शिक्षणात पुढे गेले पाहिजे यासाठी नाममात्र व्याजदरावर दहा लाखाचं कर्ज, आयकरामध्ये नोकरदारांच्यासाठी चांगला निर्णय एवढेच नव्हे तर देशातील राज्य सरकारला पंधरा वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देणार याचाच अर्थ विकास योजना राबवण्यासाठी प्रोत्साहन देणार. सामान्य लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सरसारख्या रोगावरील औषधांच्या किमती कमी केल्या



तर हिंदु, बौद्ध, जैन धर्मस्थळांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद केली. बेरोजगारी हटवण्यासाठी देशातील युवकांना कौशल्य विकास उपक्रम हाती घेवुन रोजगार निर्मिती कशी करता येईल हा विचार देखील यात आहे. स्पर्धेच्या युगात इलेक्ट्रॉनिक वहाने, सौरऊर्जा त्यासाठी दिलेली सवलत एवढेच नव्हे तर देशातील शेतकर्यांचे उत्पादन वाढले पाहिजे त्या दृष्टीने शेतीपुरक योजना राबवणे असतील किंवा अवजाराच्या किंमती स्थिर ठेवणे असेल या गोष्टीला प्राधान्य दिलं. अनेक वस्तुवरील कस्टम ड्युटी कमी केल्याचा परिणाम सोन्या चांदीचे भाव कालच पाच हजारांनी उतरले. संरक्षण किंवा इतर देशातील मुलभुत सुविधा यासाठीही कोट्यावधी रूपये आर्थिक तरतुद करण्यात आली. आपल्या देशाच्या भविष्यावरही मोठी गुंतवणुक करणारा अर्थसंकल्प ज्यामध्ये शेतकरी, महिला, युवा, गरिब चार घटक वर्ग डोळ्यासमोर ठेवले. तरूणांच्यासाठी केंद्र सरकारही आता ॲप्रेंटिस योजना हाती घेणार आहे. १०० नविन क्लस्टर तयार करण्याचा घेतलेला निर्णय ज्यामध्ये उत्पादन, आयटी सेवा या सर्व क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल. विरोधक महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही म्हणून केवळ राजकिय स्वार्थापोटी खोटं बोलत आमच्या विरोधकांनी सुरू केलेला तमाशा बिनपैशाचा असुन एक कोटी पेक्षा जास्त महाराष्ट्राला निधी मिळाला. तरी एक रूपाया मिळाला नसल्याची ओरड विरोधक केवळ बदनामीसाठी करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. मुंबई, पुणे–नागपूर मेट्रोसाठी २४०० कोटी रूपये, इंडस्ट्रिअल कोरीडॉर ४९९ कोटी, नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रोजेक्ट १५० कोटी, नदी पुनर्विकास ५०० कोटी, मुळा–मुठा नदी पुनर्विकास ६९० कोटी, ग्रामीण रस्ते ४०० कोटी, सर्व समावेशक इकॉनिमिक कोरीडॉर ४६६ कोटी, आरोग्य सेवा आणि पोषण आहार ३२०० कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २५०० कोटी मंजुर इतर सुविधांना देखील करोडो रूपये मंजुर केले. तरी सुद्धा विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.




धारूर येथील जेष्ठ पत्रकार अनिल महाजन यांनी सायं दैनिक महाराष्ट्र आरंभच्या कार्यालया सदिच्छा भेट दिल्यानंतर सत्कार करताना संपादक दीपक थोरात बुधवारी

# नावात प्रकाश प्रत्यक्षात अंधार केलेल्या आमदाराला कुटुंबासह घरी पाठवायचे आहे – ॲड. शेख शफीक भाऊ

**माजलगाव (प्रतिनिधी) – एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान माजलगाव विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.**

बैठकीत माजलगाव तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक इद्रिस पाशा, शहराध्यक्ष शेख रशीद, जिल्हा उपाध्यक्ष शेख युसूफ, माजलगाव मतदार संघ प्रभारी सिद्धीख भैय्या, वडवणी शहराध्यक्ष आमेर भाई, धारुर शहर अध्यक्ष मोबीन भाई, युवा नेते अफरोज पठाण, युवक अध्यक्ष सोहेल अत्तार, हाफेज फारुख, उपाध्यक्ष शेख समीर, गुड्डू खतीब, अलिम अत्तार, शेख अन्सार, हकीम खान, हाफेज मुखीद,, वसीम भाई, सत्तार पठाण, नसीर भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन–मन–धन झोकून काम करायचे आहे. येथील विद्यमान आमदार यांच्या नावात प्रकाश असला तरी प्रत्यक्षात मात्र त्यांच्या नाकर्तेपणामुळे संपूर्ण मतदारसंघात मोठ्या प्रमाणात अंधार पडलेला आहे. हा अंधार बाजूला सारून माजलगाव विधानसभा मतदारसंघात खरा प्रकाश पाळायचे काम फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे



करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ़ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

# दूध भेसळखोरांवर मोक्को लावा :सुरेश धस

प्रतिनिधी । बीड

दूध भेसळखोरांच्या विरोधात राज्य सरकारने वाळू, गुटखा माफियावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई चा समावेश केला तसाच दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या लोकांच्या विरोधात मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करावी आणि हा निर्णय आगामी कॅबिनेट बैठकीत मध्येच घेण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि दुग्धविकास मंत्र्यांना करणार आहे. या भेसळखोरांना गावकऱ्यांनी विष कालवे ही पदवी बहाल करावी असा उपरोधिक टोला माजी मंत्री सुरेश धस यांनी लगावला ते पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. आष्टी येथे सोमवारी (दि.५) धस यांनी पत्रकार परिषद घेतली यावेळी पुढे बोलताना धस म्हणाले की, रविवारी कडा परिसरात झालेल्या भेसळखोरांवर कडक कारवाई व्हावी. यासह मुख्य आरोपी असलेल्या व्यक्ती कडून माहिती घेऊन सहभागी लोकांना सह आरोपी करावे. मुख्य आरोपीचे मोबाईल कॉल रेकॉर्ड याचे डिटेल्स चेक करून ज्यांनी यांच्याकडून पावडर, दूध खरेदी केले त्यांच्यावर देखील कडक कारवाई करावी. या भेसळखोराकडे कोट्यवधीची मालमत्ता कुठून आली ? याचाही शोध घ्यावा. शिवाय या लोकांवर मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्यास चाप बसेल जेणेकरून असले प्रकार थांबतील. आणि राज्य सरकारला ५ रुपये अनुदान देखील देण्याची आवश्यकता लागणार नाही. आणि शेतकऱ्यांच्या दुधाला देखील ४० रुपये लिटर दर मिळू शकेल. राज्य सरकारने संपूर्ण राज्यातील दूध देणारी जनावरे यांची संख्या किती ? कोणत्या



गावचे किती लिटर दूध आहे ? याचा सर्व्हे राज्य सरकारने करावा जेणेकरून यातून खरी माहिती पटलावर येईल. आणि भेसळखोरांना आळा बसेल असेही सुरेश धस शेवटी म्हणाले.

# राजकारणी काढू लागले विविध प्रश्न मार्गी लागल्याची पत्रके

प्रतिनिधी @ बीड

सध्या राज्यात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीचे डोहाळे अनेक हौसे, नवसे, गौश्यांना लागले आहे. यामुळे चोहीकडून सर्वच पक्षाचे तथाकथित नेते, कार्यकर्ते दरदिवशी अमुक प्रश्न मार्गी, तमुक प्रश्न मार्गी अशा प्रकारची पत्रके काढून प्रसिद्धी माध्यमातून टाकत आहेत. जी पत्रके काढली जात आहेत त्यातून प्रत्यक्षात खरेच किती प्रश्न मार्गी लावले? किती प्रश्नांवर काम झाले? हे विधानसभा निवडणूक निकालानंतर दिसून येईलच, तोपर्यंत राजकारण्यांकडून टाकण्यात येणारी प्रश्न मार्गी लावल्याची पत्रके पाहण्याशिवाय गत्यंतर नाही असे रोखठोक मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे की, आता जे नेते कार्यकर्ते पत्रके काढून प्रश्न मार्गी लावल्याचे म्हणत आहेत, मुळात त्यांच्याच नाकर्तेपणामुळे ते प्रश्न निर्माण झालेले असतात. त्यांच्यामुळेच त्या-त्या प्रश्नांवर कामे होत नाहीत आणि तेच प्रश्न पुन्हा ते जनतेसमोर मार्गी लागले म्हणून मांडत असल्याने यात त्यांचाच निलाजरेपणा दिसून येतो. जे गेल्या पाच वर्षात केले नाही ते निवडणुकीच्या तोंडावर मार्गी लावल्याची पत्रके काढणे म्हणजे पडलो तरी नाक वर ही वृत्ती यात दिसून येते आणि अशी पांचट पत्रकं छापल्याने ज्या वृत्तपत्रात ती प्रकाशित केली जातात ती वृत्तपत्रे हातात घेतल्यानंतर अशा पत्ररुपी बातम्यांकडे वाचक साधी नजर टाकायलाही तयार नाहीत. यामुळे अशा प्रकारची पत्रके छापणाऱ्या वृत्तपत्रांच्या विक्रीवर सुद्धा विपरीत परिणाम होऊ लागला आहे. आता जनता शहाणी झाली आहे. यांच्या अशा प्रश्न मार्गी लागल्याच्या भूलथापारुपी पत्रकांवर ती विश्वास करत नाहीये. थोडक्यात बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर अशा स्थितीत जनता आलेली आहे परंतु स्वतःला फार मोठे कर्ते करविते म्हणून जनतेसमोर सादर करण्याचा केविलवाणा प्रयत्न करणाऱ्या राजकारण्यांचा प्रश्न मार्गी लागल्याची पत्रके काढण्याचा



केविलवाना प्रयत्न काही थांबायला तयार नाही. अशी पांचट पत्रके छापून आपल्या वृत्तपत्राचा टीआरपी वाचकांच्या हृदयातून व नजरेतून किती खाली येऊ द्यायचा? अशी पत्रके न छापता सत्य तेच प्रकाशित करण्याचा विडा वृत्तपत्रांनी उचलणे गरजेचे आहे. नाहीतर अशा पत्रकांच्या भंपक आणि पांचट प्रसिद्धीमुळे आपली वर्तमानपत्रे वाचकांच्या नजरेतून उतरतील. याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे रोखठोक मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

# बीड मध्ये मुख्याध्यापक उतरले रस्त्यावर!

## अनुदानाचा वाढीव टप्पा आणि जुनी पेन्शनच्या मागणीसाठी मुख्याध्यापकांचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन

सायं.दै.लोकदिशा @ बीड

राज्यातील सर्व अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर द्यावा, राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यासाठी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया समोर दुपारी ३ ते ६ या वेळेत धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील बहुतांश शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते.




महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर जमा करावा तसेच राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह शाळांतील विविध शैक्षणिक समस्या संदर्भात बीड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि सचिव विष्णुपंत रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली आज मंगळवार दिनांक ०६ ऑगस्ट २०२४ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षणाबाबत सरकारची किती उदासिनता आहे. याबाबत उहापोह करण्यात आला. यावेळी अनेक मुख्याध्यापकांनी सरकारच्या या उदासिनत धोरणा बाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आपल्या न्याय्य आणि रास्त मागण्या मान्य करण्यासंदर्भात घोषणा दिल्या. या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय आणि परिसर दणाणून गेला. त्या नंतर शिष्टमंडळानेशिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना आणि शिक्षण सचिवांना देण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रचलीत धोरणानुसार अनुदान टप्पा तात्काळ लागू करावा,१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर अनुदानावर आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागु करावी, १५ मार्च २०२४ चा सुधारीत संच मान्यता शासन निर्णय रद्द करुन शाळा तेथे मुख्याध्यापक पद हे धोरण असावे,१५ मार्च २०२४ वर्ग ५ वी व ८ वी च्या वर्गाचा दर्जावाढ निर्णय तात्काळ रद्द करावा, शिक्षक कर्मचारी भरती तात्काळ करावी, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिकल योजना तात्काळ लागू करावी, ०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागु करावी या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष पैठणे सर, सचिव विष्णुपंत रसाळ सर, संस्था प्रतिनिधी संघटने प्रतिनिधी सुशीलाताई मोराळे मॅडम, जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा शिक्षक संघाचे राजकुमार कदम सर, डी. जी. तांदळे सर, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे सर, गणेश आजबे सर, शिक्षकेतर संघटनेचे श्री कळबंकर सर, युक्रांचे पंडित तुपे सर, डिंगांबर पांचाळ सर,लक्ष्मण इंगोले सर, अनिल काळे सर, प्रदीप गाडे सर, गणेश घोडके सर, रमेश बागलाने सर, सुशीलकुमार गायकवाड सर, कानडे सर, भीमराव सावंत सर, रामहरी कदम सर, सुराज्य शिक्षक संघटनेचे पदाधिकारी दत्तात्रय चव्हाण सर, काजळे सर, विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, भागवत यादव सर, सुरेश कदम सर, प्रकाश कदम सर, गणेश गुजर, सय्यद सर, पि के कदम सर, एम पी शिरसाट सर, पांचाळ सर, सावंत सर, फपाळ सर, डोंगरदिवे सर, हाके सर, गरड सर, मेहेत्रे सर, वक्ते सर, मंदे सर, शर्मा सर, यांच्यासह विविध शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# मल्टिस्टेटच्या ठेवीदारांना न्याय देण्याची राज्यसभेत खा.सौ.रजनीताई पाटील यांची मागणी

केज /प्रतिनिधी

मराठवाडा व विशेषतः बीड जिल्ह्यातीलगोरगरीब कष्टकरी,नौकरदार, पेन्शनर यांना मल्टीस्टेट चालकांनी जादा व्याज देण्याचे आमिष दाखवून अनेकांच्या ठेवी ठेवून घेतल्या व आता हे मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाले आहेत मात्रयामध्ये सर्वसामान्य लोक भरडली जात आहेत.कोणी आपल्या मुलीच्या लग्ना साठी पैसे साठवले होते. कोणी आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी पैसेसाठवले होते तर कोणी रात्र दिवस कष्ट करून या मल्टीस्टेट मद्ये पैसे ठेवले होते मात्र आता या मल्टीस्टेटचे दिवाळे निघाले आहेत त्यामुळे ज्यांनी या मल्टीस्टेटला परवानग्या दिल्या त्यांनी या लोकांचे पैसे परत देण्याची देखील जबाबदारी घेतली पाहिजे व सरकारने त्या लोकांना न्याय मिळवून दिला पाहिजे अशा शब्दात काँग्रेसच्या नेत्याराज्यसभा खासदार सौ.रजनीताई पाटील यांनी यामहत्वाच्या मुद्यावर आज राज्यसभेत आवाज उठवला त्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांतून त्यांचे आभार व्यक्त होत आहेत.

मराठवाडा व विशेषतः बीड जिल्ह्यातीलगोरगरीब कष्टकरी,नौकरदार, पेन्शनर यांना मल्टीस्टेट चालकांनी जादा व्याज देण्याचे आमिष दाखवून अनेकांच्या ठेवी ठेवून घेतल्या व आता हे मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाले आहेत मात्रयामध्ये सर्वसामान्य लोक भरडली जात आहेत.कोणी आपल्या मुलीच्या लग्ना साठी पैसे साठवले होते.





बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा २०२४ च्या पार्श्वभूमीवर मंगळवारी जयदत्त आण्णा क्षीरसागर विचारमंचच्या महिला आघाडीची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीत महिला भगीनींना मार्गदर्शन करताना माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी बीड विधानसभेचे रणसिंग फुंकत बीड नगरपरिषदेच्या मा.नगरसेविका सौ.जयश्री विलास विधाते यांची बीड विधानसभा महिला आघाडी प्रमुख म्हणून घोषणा केली. आजपासुन विधाते ताईच्या नेतृत्वात महिला आघाडी विधानसभेच्या रणांगणात आपण आजवर केलेल्या विकासकामाचा लेखाजोखा सामान्य मतदार भगींनी पर्यंत घेऊन जातील अशा माता भगीनींचा आशिर्वाद आणि शुभेच्छातुन उभा राहाणारी स्त्री-शक्ती येणार्या विधानसभेत यश आपल्या पदरात पाडून घेईल आसा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी जयश्री विधाते यांनी पदभार स्वीकारत बैठकीला संबोधित करताना म्हणाल्या की, आण्णासाहेबांनी महिला आघाडी प्रमुख पदाची टाकलेली जवाबदारी सर्व कार्यकर्त्या भगीनींच्या सहकार्याने रात्र-दिवस एक करुन आण्णासाहेबांना प्रचंड बहुमताने पुन्हा एकदा विधानसभेत पाठवण्याचा निर्धार केला.

# निष्क्रिय आघाडी सरकारमुळे मतदार संघात निर्माण झालेला विकासाचा बॅकलॉग आमदार पवारांनी भरून काढला

## नुकताच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ६५ कोटी तर अर्थसंकल्पातून ८२ कोटीचा निधी मंजुर

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई मतदार संघात नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ७ गावच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ६५ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला तर अर्थसंकल्पातून २३ गावच्या रस्त्याला ८२ कोटी ४५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. शेवटच्या टप्यातही मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आमदार पवार आघाडी सरकारच्या काळातील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत.

आ. लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघातील जवळजवळ सर्वच प्रमुख व गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागले आसून उर्वरित रस्त्यासाठीही त्यांचा पाठपुरावा व प्रयत्न सुरू असुन नव्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गेवराई मतदार संघातील रामपुरी ते ढालेगाव रस्ता ४.७१ किमीसाठी रु ७ कोटी ४३ लक्ष, प्रजिमा माटेगाव ते ब्राम्हगाव ३ किमी या रस्त्यासाठी रु ४ कोटी ३९ लक्ष, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी या रस्त्यासाठी रु ७ कोटी ९० लक्ष, मारफळा फाटा ते लोणाळा - खेरडावाडी ते चिंचोली ४.६५० किमी या रस्त्यासाठी रु ६ कोटी ६७ लक्ष, रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.तलवाडा रोड ते रेवकी देवकी गोंदी रस्ता १२.२०० किमीसाठी रु २७ कोटी ७ लक्ष, टाकरवन - तलवाडा रोड ते सेलू ३.५४ किमी या रस्त्यासाठी रु ५ कोटी २४ लक्ष, सावरगाव ते चिखली रस्ता ४.२०० किमीसाठी रु. ६ कोटी २७ लक्ष असा या ७ गावच्या ४० किमी सिमेंट काँक्रिट रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयाच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. तलवाडा रोड ते रेवकी-देवकी ते गोंदी रस्ता अवैध वाळू वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला होता. या रस्त्यावरून वागणे अक्षरशः नागरिकांना असाहाय्य झाले होते. विशेष बाब म्हणून आमदार पवार यांनी नामदार गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून साडेपाच मीटर रुंदीचा सिमेंट काँक्रिट हा एकमेव रस्ता मंजूर करून घेतला आहे. गेवराई मतदार संघातील प्रत्येक गावांची रस्त्यांची अडचण दुर करण्यासाठी विविध योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून प्रत्येक वर्षी रस्ते मंजुर करून मतदार संघातील दळण वळणांचा मार्ग सुकर करत आसल्याचे त्यांनी कळवले आहे.



नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात एकूण २३ रस्त्याच्या कामांना ८२ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामध्ये चकलांबा ते तरडगव्हान रस्ता २ कोटी ५० लक्ष, बोरगाव ते कुरणपिंपरी ६ कोटी, गोपतपिंपळगाव ते काठोडा तांडा व काठोडा तांडा ते जातेगाव या सिमेंट काँक्रिट रस्त्यासाठी रु १५ कोटी तर, तलवाडा चौक ते गंगावाडी फाटा २ कोटी ५० लक्ष, चकलांबा मुख्य रस्ता ते धुमेगाव ५० लक्ष, धानोरा मुख्य रस्ता ते तळवट बोरगाव ८० लक्ष रु., चकलांबा रस्ता ते हिवरवाडी ५० लक्ष, चव्हाणवाडी ते विठ्ठलनगर ६० लक्ष, गढी माजलगाव रस्ता ते जांभळीतांडा - खोपटी तांडा - गावखोरी तांडा ते भिल्लखोरी तांडा ४ कोटी ७० लक्ष, चकलांबा रस्ता ते महाडूळा १ कोटी, कवडगाव थडी ते सुरडी नजीक ३ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ते कोल्हेर रस्ता ५ कोटी, केकत पांगरी ते हरीलाल नाईक तांडा २ कोटी रु, गुळज ते नरसिंह तांडा ३ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ते भेंड खु. भेंड बु ३ कोटी, गेवराई- कोल्हेर (उजवा कालवा) रस्ता ४ कोटी, माजलगाव राष्ट्रीय महामार्ग ते तालखेड ५ कोटी, बीड एमआयडीसी ते कुर्ला ५ कोटी, राष्ट्रीय महामार्ग ६१ ते तळेवाडी ३ कोटी ५० लक्ष, उमापूर फाटा ते उमापूर ७ कोटी ५० लक्ष, राष्ट्रीय महामार्ग ६१ हरकी निमगाव ते मंगरूळ ६ कोटी, पाचेगाव रस्ता ते आहेर वाहेगाव ३५ लक्ष रुपये या रस्त्यांचा समावेश आहे.

गोपत पिंपळगाव येथे गोदावरी नदीवर केंद्रीय रस्ते विकास निधी मधून ३५ कोटी रुपयांचा पूल मंजूर झाला आहे.सध्या ते काम देखील प्रगतीपथावर आहे. विदर्भ मराठवाड्याला जोडणारा हा एक भविष्यातील प्रमुख मार्ग असून परिसराच्या विकासासाठी हा रस्ता एक प्रमुख रस्ता ठरणार आहे. याही रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासाठी गोपत पिंपळगाव - रामपुरी - काठोडा - गोळेगाव ते जातेगाव या रस्त्याच्या कामासाठी वरील प्रमाणे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आणखीन ४० किलोमीटरचे रस्ते प्रस्तावित असून येणाऱ्या काळात त्याही रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळून निधी उपलब्ध होईल असे आमदार पवार म्हणाले.तलवाडा - टाकरवण या रस्त्याप्रमाणेच गेवराई - चकलंबा गावाच्या रस्त्याचे काम प्रगती पथावर असून पाडळसिंगी - पाचेगाव - पिंपळनेर - ताडसोन्ना या रस्त्याचे कामही प्रगती पथावर आहे. तसेच गेवराई - जातेगाव - मारफळा या ७ मिटर रुंदीच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे कामही लवकरच सुरू होणार आहे. गेवराई शहरातून गेलेल्या महामार्गाचे सुद्धा सुशोभीकरण व रुंदीकरणासाठी प्रकल्प अहवाल तयार असून त्यालाही लवकरच निधी मंजूर होईल.



# अमर नाईकवाडे फारुख पटेल मोंढा मंजूर झालेल्या रस्त्याचे श्रेय घेण्यासाठी केविलवाणी प्रयत्न

## पंधरा दिवसाचा तुरुंगवास करण लोंढे ने भोगला आणि श्रेय घ्यायला निघाले पटेल नाईकवाड

मनसेने केलेल्या आक्रमक आंदोलनाला मोठे यश अमरधाम शमशानभूमी ते शिवशारदा बिल्डिंग रस्ता मंजुरी

अमरधाम शमशानभूमी ते शिव शारदा बिल्डिंग जुन्या मोंढ्याला जोडला जाणारा मुख्य रस्ता तसेच श्री संत सावता माळी चौक जिजामाता चौक व जालना रोडला जोडणारा मुख्य रस्ता असून हा रस्ता लवकरात लवकर बनवा म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी फार संघर्ष केला नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाच्या आंदोलन छेडली तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडल्यामुळे त्यांना पंधरा दिवस तुरुंगवास भोगाव लागला परंतु तुरुंगवासातून बाहेर येऊन देखील त्यांनी ह्या रस्त्यासाठी संघर्ष चालूच ठेवला गेल्या दोन वर्षांमध्ये त्यांनी ह्या रस्त्यासाठी अनेक आंदोलन उभे केले आतापर्यंत केलेल्या सर्व आंदोलनाची प्रशासनाने दखल अखेर घेतलीच अमरधाम शमशानभूमी ते शिव शारदा बिल्डिंग ह्या रस्त्याला प्रशासनाने मंजुरी दिली आहे लवकरच त्या रस्त्या कामाला सुरुवात करण्यात येईल याची सर्वसामान्य नागरिकांनी दखल घ्यावी

रस्त्यावर उतरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे करण लोंढे यांनी केले होते आंदोलन

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी या अगोदर शिव शारदा बिल्डिंग ते मोंढरवाडीतील समशान भूमी अमरधाम पर्यंतच्या रस्त्यासाठी सरळ रचून समशानभूमी नदीवरील पुलावती आंदोलन केले होते सदरील आंदोलन आंदोलनाला यश आल्यामुळे या ठिकाणी अमर नाईकवाडे फारुख पटेल यांनी या रस्त्याचे श्रेय घेऊ नये असेही यावेळी मनसेचे शहराध्यक्ष करण भैय्या लोंढे यांनी सांगितले आहे.

# पुढा-यांनो लाजा वाटु द्या बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विरहीत

## झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये, समाज मंदिरात तर किरायाच्या घरात भरतात शाळा:- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी @ बीड**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विरहीत असुन तब्बल १० वर्षापासुन या शाळा झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये, समाज मंदिरात तर काही ठिकाणी किरायाच्या रूममध्ये भरत आहेत.ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणासाठी पायाभूत सुविधांचा अभाव असुन शिक्षणावर कोट्यवधींचा खर्च केल्याचा जाहिरातीतुन गाजावाजा करणा-या सरकारला आणि शिक्षण विभागाला याचे गांभीर्य दिसून येत नाही. या शाळांना शाळा इमारतीसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे. खरंतर विकासाच्या नावाने बोंबाबोंब करणा-या लोकप्रतिनिधींनों जरा लाज वाटु द्या अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील बीड शहरापासुन ८ किलोमीटर अंतरावरील २५० लोकसंख्या असलेल्या कोटुळे वस्ती वर २००३ पासुन वस्ती शाळा असुन तेव्हा पासून १० वर्षं १००० रुपये महिना कंत्राटी तत्वावर काम केलेले आहे.२०१३ पासुन शासनमान्यता मिळालेली आहे.आमचे बंधु काकासाहेब कोटुळे यांनी शाळेसाठी ६ गुंठे जागेचे दानपत्र करून दिलेले आहे.मात्र अद्याप शाळेसाठी इमारत बांधकाम करण्यात आलेले नाही.असे वस्ती शाळेवरील सहशिक्षिका माधुरी कोटुळे यांनी सांगितले.

जुन २०२३ पासुन कोटुळे वस्तीवर कार्यरत असुन बीड शहरातील केंद्रीय शाळा धोंडीपुरा अंतर्गत कोटुळे वस्ती शाळेला इमारत नाही.पत्र्याच्या शेडमध्ये मुलांना जागा पुरत नाही. झाडाखाली शाळा भरवावी लागते.सध्या विद्यार्थी पटसंख्या ३४ असुन शाळेतील असुविधा विषयी शिक्षण विभागाला कळवण्यात आले आहे. परंतु अद्याप ईमारती साठी निधी मिळालेला नाही. असे मुख्याध्यापक गणेश ढाकणे यांनी सांगितले.

शाळेला पक्की इमारत नाही . झाडाखाली , पाऊस आल्यावर पत्र्याच्या शेडमध्ये लेकरं बसतेत नाहीतर.पावसाळ्यात वादळवारा त्यामुळे लेकरांची काळजी वाटते त्यामुळे सरकारने पक्का ईमारतीची सोय करावी अशी मागणी पालक मनिषा कोटुळे, बिभीषण कोटुळे यांनी केली आहे.



आष्टी तालुक्यातील जि.प.प.प्रा.शा.खेडकर गोठे,अंबेजोगाई तालुक्यातील एकुण ६ ( चनई तांडा, बरड वस्ती,लोखंडी सावरगाव विट भट्टी परीसर दवाखाना , भीमाई वस्ती,उघडे वस्ती वरवंटी, कुसळवाडी तांडा नं .२.बीड तालुक्यातील २८ (गवळवस्ती खापर पांगरी, आसराई वस्ती नाळवंडी, पवार वस्ती काळेगाव,खांडे वस्ती म्हाळसजवळा,मस्कर वस्ती सुर्याची वाडी,खोले वस्ती आहेर धानोरा,कोटुळे वस्ती वरवटी, घुमरे वस्ती वरवटी, आगम वस्ती पिंपरगव्हाण,बारकुल वस्ती गौळवाडी, खांडेकर वस्ती पाली, इस्मालेदरा वस्ती पाली, जगताप वस्ती कर्झणी,गौळी वस्ती पालदरा,बोरबन वस्ती पिंपळवाडी,तांबारे वस्ती साक्षाळपिंप्री,हिंगे वस्ती साक्षाळपिंप्री,नरनाळे वस्ती इट,माने वस्ती लिंबा,बेलगाव वस्ती बेलगाव, विठ्ठलवाडी नागझरी, मुंडे वस्ती ताडसोन्ना,क्रांती वस्ती ताडसोन्ना, जाधववस्ती वांगी, महादेव दरा तांडा मैंदा, मुंडे वस्ती बोरदेवी, सानप वस्ती रूद्रापुर .धारूर तालुक्यातील ३ (आनंद नगर,संचगाणी तांडा,खोडस तांडा).केज तालुक्यातील १७ ( यमाई वस्ती,चिंचकर वस्ती,डांगे वस्ती, विठ्ठल वस्ती,येडका वस्ती,गदळे वस्ती, हनुमान वस्ती, हनुमान वस्ती तुकाचीवाडी, गजानन नगर, विठ्ठल नगर वस्ती, भालगाव नं १ ऊर्दू, चिंचोली माळी ऊर्दू, मेटे वस्ती,घाटे वस्ती,सोनदरा वस्ती,हरगड वस्ती,लहुरी ऊर्दू .गेवराई तालुक्यातील ११ ( मोरे वस्ती राजपिंपरी, शेंबडे वस्ती शेकटा, गदाडे वस्ती शेकटा, हनुमान नगर धुमेगाव,नालसाहेब वस्ती नंदपुर, काटकर वस्ती कुंभार वाडी, लक्ष्मण वस्ती खडकी, शिंदे वस्ती खडकी, धनगर वस्ती गाडेवाडी,अंकोटा ,देवीतांडा तलवडा,.परळी तालुक्यातील १२ ( सारडाव वस्ती, डाव वस्ती धर्मापरी, मणियार धर्मापरी, महादेव वस्ती, जांभुळ दरा तांडा, शिवाजीनगर सिरसाळा, विट भट्टी सिरसाळा,रायणार सिरसाळा,नेहरू नगर सिरसाळा, राधानगर सिरसाळा,हेमा नाईक तांडा,महोदरा तांडा .पाटोदा तालुक्यातील ३ (भांगे वस्ती,टोकवाड वस्ती,तांबे वस्ती).शिरूर तालुक्यातील ५ ( महात्मा फुले नगर, विठ्ठल वस्ती,

### बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विना

बीड जिल्ह्यातील बीड तालुक्यातील २८, केज तालुक्यातील १७, परळी तालुक्यातील १२, माजलगाव तालुक्यातील ११,गेवराई तालुक्यातील ११,अंबेजोगाई तालुक्यातील ६, शिरूर तालुक्यातील ५, पाटोदा तालुक्यातील ३, धारूर तालुक्यातील ३, आष्टी आणि वडवणी तालुक्यातील प्रत्येकी१ अशा एकुण ९८ जिल्हा परिषद वस्ती शाळा इमारत विना असुन



परळी- परळी येथील इंजि.राजू जगतकर यांची दुबई येथील बुलेट ट्रेन मध्ये असिस्टंट मॅनेजर या पदावर निवड झाली आहे. त्या निमित्ताने परळी येथील मिलिंद विद्यालयातील वर्ग मित्रपरिवार यांनी केला सत्कार व पुढील वाटचालीस दिल्या हार्दिक शुभेच्छा...

# प्रयोगशील शिक्षक संतोष कोठेकर मराठीमध्ये ‘नेट’आणि ’सेट ’ परीक्षा उत्तीर्ण

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जि.प.प्रा.शा. हरिलाल तांडा येथील विद्यार्थीप्रिय आणि प्रयोगशील शिक्षक संतोष कोठेकर यावर्षी ७ एप्रिल रोजी झालेल्या सेट परीक्षेत मराठी या विषयात उत्तीर्ण होऊन सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत. गतवर्षीही यूजीसी नेट यांच्याकडून राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या नेट परीक्षेतही ते उत्तीर्ण होऊन ते सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत.

खरंतर पीएचडी, सेट, नेट, धारक उच्चविद्याविभूषित शिक्षकांना शिक्षण क्षेत्रातील अधिकारी पदावर थेट नेमणूक द्यावी असा पंचतारांकित प्रश्न थेट विधानसभेत उपस्थित करण्यात आला होता. पण त्यावर पुढे कोणतीही कार्यवाही राज्य सरकारच्या शिक्षण विभागाकडून झाली नाही. निश्चितच असे शिक्षक वरिष्ठ पदावर गेल्यावर विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याच्या दिशेने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.संतोष कोठेकर यांच्या या यशाबद्दल गेवराई तालुका शिक्षण विभाग तथा सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# ओस्तवाल यांची सेवा सीमापार-संपादक संग्राम धनवे



**प्रतिनिधी @ बीड**

दि. ०६/०८/ २०२४ रोजी सकाळी ठिक ११:३० वा. गुरु आनंद प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन , मुंबई यांच्या सहकार्याने मोफत वह्या वाटप कार्यक्रम समर्थ विद्यायय येथे पार पडला,या कार्यक्रमास प्रमुख पाहुने संपादक संग्राम धनवे साहेब,लोकशा निवासी संपादक उत्तम हजारे,मुख्यध्यापक सुभाषराव पवळ,गुरु आदंन प्रतिष्ठनच्या सीमाताई ओस्तवाल,माजी सभापती पांडुरंग कोळेकर,राम नवले,पत्रकार रोहित लंबे,भारत तांबरे,भारत मगर,पांडुरंग कारंडे,सुरेश दाभाडगावकर,अशोक चिखले संचार उमप,संतोष पाबळे,व इतर उपस्थित होते..

# जो जमीन सरकारी है! वो जमीन हमारी है!

**प्रतिनिधी @ बीड**

### वंचित चे सर्वजित बनसोडे यांनी दिली करचुंडी येथील गायरान धारकांच्या आंदोलनास भेट

करचुंडी येथे गायरान धारक २० जुलैपासून गावामध्येच गायनाचा सातबारा मिळावा आंदोलन करत आहेत. या आंदोलनाची दखल घेत वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष तथा प्रखड वक्ते करचुडी येथे भेट दिली. करचुंडी येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे भेट देणार होते परंतु आरक्षण बचाव यात्रेनिमित्त जिल्हा दौरा व्यस्त असल्यामुळे येऊ शकले नाही. त्यामुळे राज्याचे उपाध्यक्ष सर्वजीत बनसोडे यांनी या आंदोलनकर्त्यांची गावात जाऊन भेट घेतली. याप्रसंगी त्यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे नेते निरीक्षक डॉ.नितीन सोनवणे, जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम (गोटू) वीर, युवक जिल्हा महासचिव ॲड. राजेंद्र कोरडे, आंदोलन संयोजक जयसिंग वीर हे उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सर्वजित बनसोडे म्हणाले की सरकारी है वो जमीन हमारी है, एका वक्तव्याचा संदर्भात त्यांनी गायरान जमीन आंदोलनात सहभागी असलेल्या सर्व गावकऱ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले, जोपर्यंत गायरान धारकांचा सातबारा त्यांच्या नावे होत नाही तो पर्यंत वंचित बहुजन आघाडी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असे त्यांनी सांगितले. १९६५ पासूनचा हा लढा गायरान जमीन कसणारी लढत आहेत.



अद्यापही शासनाने या आंदोलन प्रकल घेतली नाही. ना नामदार, ना खासदार, ना आमदार यांनी देखील भेट दिली नाही. या प्रश्नावर तोडगा करण्यासाठी आपण लवकरच वरिष्ठ पातळी प्रयत्न करू असं त्यांनी सांगितले यावेळी गावातील सर्व गायरानधारक त्यांचे कुटुंबीय व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानदीप विद्यालयाचे शिक्षक मुंजाराम निरडे जिल्हास्तरीय पंच परीक्षेत उर्तीर्ण सर्वत्र कौतुक

किल्लेधारूर (रोहित फावडे)

धारूर शहरातील ज्ञानदीप विद्यालयातील शिक्षक मुंजाराम निरडे हे जिल्हास्तरीय खो खो पंच परीक्षा उत्तीर्ण झाले असून त्यांना नुकतेच हे प्रमाणपत्र देण्यात आले त्याचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.



धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक मुंजाराम निरडे जिल्हास्तरीय खो - खो पंच परीक्षा उत्तीर्ण ज्ञा नदीप विद्यालयातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व तथा विद्यालयाचे क्रिडा विभाग प्रमूख . मुंजाराम निरडे यांनी एमॅच्युअंर असोसिएशन बीड यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हा खो - खो पंच परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्याचे या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे

## राजसाहेब ठाकरे यांच्या बीड जिल्हा दौरा कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे:- श्रीराम बादाडे मनसे जिल्हाध्यक्ष.

वडवणी /प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष हिदुजननायक राजसाहेब ठाकरे हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हयात दि १०,११ ऑगस्ट रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत, परभणी, पाथरी वरुन माजलगाव शहरात आगमन होणार, ठिक ३:०० वा छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजसाहेब ठाकरे यांचे जंगी स्वागत माजलगाव, वडवणी, धारूर तालुक्याच्या वतीने करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमाला मनसे पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनसे बीड जिल्हा अध्यक्ष श्रीराम बादाडे यांनी केले आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे हे आगामी विधानसभा निवडणुकी संदर्भात रणनीती ठरविण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी दि.१० व ११ ऑगस्ट रोजी बीड जिल्हा दौर्यावर येत असुन दि.१० ऑगस्ट रोजी

राजसाहेब ठाकरे यांचे गडी मार्गाने बीड येथे ५:०० वा आगमन होणार बीड येथे राजसाहेब यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे दि ११/८/२०२४ सर्व पदाधिकारी अंगिक्रत संघटनेचे पदाधिकारी इच्छुक उमेदवार यांना मार्गदर्शन करणार आहेत तरी सर्व बीड जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी राजसाहेब ठाकरे यांच्या दौऱ्यानिमित्त स्वागतासाठी माजलगाव, वडवणी, धारूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक यांनी माजलगाव येथे ३:०० वा यावे तसेच बीड विधानसभेतील सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक यांनी बीड येथे दि १०/८/२०२४ रोजी ठिक ५:०० उपस्थित राहावे, राजसाहेब ठाकरे बीड येथे मुक्कामी आहेत. तसेच दि ११/८/२०२४ ऑगस्ट रोजी बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी महाराष्ट्र सैनिक यांची बैठक सकाळी ठिक ९:०० बैठक घेण्यात येणार आहे तसेच राजसाहेब ठाकरे हे ठिक २:०० वा जालना जिल्ह्याकडे रवाना होतील तरी राजसाहेब ठाकरे यांच्या बीड जिल्हा दौरा कार्यक्रमास मनसे पदाधिकारी, सैनिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनसे बीड जिल्हा अध्यक्ष श्रीराम बादाडे पाटील यांनी केले आहे.

## माजलगाव कृ.उ.बाजार समितीची ४एक्कर जागेची माहिती देण्यात टाळाटाळ,खरेदी विक्री करणार्यांची ईडी मार्फत चौकशी करा- शेख रशिद

माजलगाव- माजलगाव कृ.उ.बाजार समितीची ४ एक्कर जागा विकण्यात आली असुन संचालक, संबंधित अधिकारींनी हातमिळवणी करून कर्जाच्या नावांवर करोडोंची जागा कवडीमोल किंमतीत विकण्याचा डाव फत्ते करण्यात आली असुन २० लाख रूपयेत इसारपावती करण्यात आल आहे. माजलगाव कृ.उ.बाजार समितीच्या ४एक्कर जागेची खरेदी विक्री करणार्यां संचालक व संबंधित अधिकारींची ईडी मार्फत चौकशी करुन तात्काळ गुन्हे दाखल करावे नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना ई-मेल द्वारे मागणी केली आहे.

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने १७ वर्षांपूर्वी टीएमसी, रस्ते व नाल्यांसाठी कर्ज घेतले होते. बाजार समितीला उत्पन्न मोठ्या प्रमाणात असताना हे कर्ज मुदतीत फेडले नाही. यामुळे व्याज व दंडाची रक्कम वाढत गेली. सध्या बाजार समितीने मनूर रोडवर असलेली चार एकर जमीन विक्री करण्यात आली आहे.




माजलगाव बाजार समिती ही उत्पन्नाच्या बाबतीत मराठवाड्यातील दोन नंबरची बाजार समिती म्हणून ओळखली जाते. या बाजार समितीला शासनाच्या योजनेतून टीएमसीमार्फत बाजार समिती आवारात प्रयोगशाळा, कार्यालय व शेडसाठी २००७ मध्ये १ कोटी, तर नवीन मॉड्यातील रस्ते व नाली बांधकामासाठी १ कोटी रुपये कर्ज अल्प दरात मिळाले होते. यापैकी काही कर्ज बाजार समितीने फेडले होत परंतु नंतर कर्जफेड केली नाही. त्यामुळे कर्जाची रक्कम ३५ लाख तर दंडव्याज ३० लाख झाल्याचे बाजार समितीकडून सांगण्यात आले असून आतापर्यंत कर्जांची परतफेड का केली नाही? हयात कोण जिम्मेदार आहे हयांची तात्काळ चौकशी करावे तसेच माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची ४ एक्करची जागा प्रशासनाने ताब्यात घेण्यात यावे तसेच माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ४ एक्कर जागेची खरेदी विक्री करणार्यां संचालक व संबंधित अधिकारींची ईडी मार्फत चौकशी करावे नसता नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेल द्वारे मागणी केली आहे.

## बीडमध्ये फिरते बाल वाचनालय सुरु

### बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या अनोख्या उपक्रमाचे कौतूक

प्रतिनिधी। बीड

शहरातील संभाजी प्राथमिक शाळेत बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून फिरत्या बालवाचनालयाचे उद्घाटन मंगळवारी (दि.६) करण्यात आले.कार्यक्रमास बालरंगभूमी परिषदेच्या डॉ.दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, प्रा.अनिता शिंदे, प्रा.विजयकुमार राख, प्रा.सुरेश थोरात, चंदनशिव, सुरेश साळुंके, मुख्याध्यापिका भोज खरसाडे, रणखांब, वीर, धर्मे, वायभट आदींची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी बालगीते, राज्य गीत, देशभक्तीपर गीते गायली आणि नृत्याचे सुंदर असे सादरीकरण केले.

बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचा भाग म्हणून डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी फिरते वाचनालय सुरु केले आहे. या उपक्रमामध्ये दोन पेट्या तयार करण्यात आलेल्या असून एक जिल्ह्यासाठी तर दुसरी तालुक्यासाठी असेल. ज्यामध्ये बालक, कुमारवयीन मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, बोधकथा, बालगीते, समाजसुधारकांचे विचार अशी अनेक बालसंस्कार आणि बाल मनोरंजन करणारी पुस्तके आहेत. १० दिवस ही पुस्तक पेटी एका शाळेत मुलांना वाचनासाठी उपलब्ध राहील. पुढे १० दिवसांनी दुसर्या शाळेत फिरवल्या जाईल, असे हे फिरते बाल वाचनालय आहे. यावेळी ग्रंथालय प्रमुख डॉ.शेख यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनासंबंधी सूचना दिल्या. संभाजी शाळेच्या मुख्याध्यपिका वीणा भोज यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वीर यांनी केले. आभार



डॉ.दुष्यंता रामटेके यांनी मानले.सध्या मुले लहानपणापासूनच मोबाईलच्या आहारी जाऊन, डोळ्याचे विकार असतील व इतर आजार किंवा डिप्रेशनने ग्रासलेले दिसतात. तेव्हा वाचन संस्कृती वृद्धिंगत करून हा संस्कार बाल मनावर रुजवावा. या उद्देशाने फिरते बाल वाचनालयाची सुरवात करण्यात आली आहे. सर्व शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे मत बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

## दलित वस्तीमधील निधी इतरत्र वळविणाऱ्या नाईकवाडे, पटेलांचा जातीवादी चेहरा उघड!

बीड (प्रतिनिधी)

शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील दलित वस्त्यांच्या रस्त्यांची दयनीय अवस्था आहे. या भागात खऱ्या अर्थाने विकास करण्याची गरज असताना तेथील निधी इतरत्र वळविणाऱ्या माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, फारुक पटेल यांचा खरा जातीवादी चेहरा जनतेसमोर आला आहे, अशी टीका बहुजन रयत परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे यांनी केली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक ३ मध्ये अनुसूचित जातीतील लोकांच्या घरासमोरील रस्ते अद्यापपर्यंत केलेले नाहीत. हनुमान नगर व पूरग्रस्त कॉलनी याठिकाणी दलित वस्ती असून तेथील रस्ते केले नाहीत. आतापर्यंत या रस्त्यावर गुडघ्याएवढे गवत आलेले आहे. गत वर्षी मी स्वतः स्वखर्चाने मुरूम टाकून रस्ते वाहतुकीयोग्य करून दिले आहेत. स्थानिक माजी नगरसेवक स्वतःच्या फायद्यासाठी फक्त आश्वासन देतात व दलित समाजाचा निधी इतरत्र वळवितात. असे झाल्यास या भागातील नागरिकांना सोबत घेऊन मोठे आंदोलन उभा केले जाईल. यानिमित्ताने नाईकवाडे, पटेल यांना विकास निधी इतरत्र वळवून दलित वस्त्या भकास करायच्या आहेत का? असा सवाल विनोद उर्फ दादा हातागळे यांनी उपस्थित केला आहे.

## तरुणांनी जिद्द आणि चिकाटी ठेवल्यास यश नक्की मिळते सविताताई गोल्हार

आष्टी ।प्रतिनिधी

शिक्षण घेत असताना अनेक खडतर अडचणीचा सामना करावा लागतो हे निश्चित परंतु आपण शिक्षण घेत असताना आपल्याला काय व्हायचे त्यासाठी मेहनत करावी व आपण जे ध्येय डोळ्यासमोर ठेवला आहे ते ध्येय पूर्ण करण्यासाठी आपल्या मेहनतीची ही जोड असते त्यामुळे तरुणांनी जिद्द आणि चिकाटी ठेवल्यास कोणत्या क्षेत्रात यश प्राप्त करता येते असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्षा सौ,सविता ताई गोल्हार यांनी व्यक्त केले ते आष्टी तालुक्यातील देवळाली पानाची येथील परमेश्वर महादेव तांदळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार सोहळ्यांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होत्या परमेश्वर नी पोलीस उपनिरीक्षक या पदापर्यंत पोहोचला घरची परिस्थिती हालाखिची असतानाही त्यांनी त्यावर मात केली दोन-तीन वेळा तो परीक्षेत त्याला यश आले नाही परंतु तो न डगमगता त्याने मनात ठेवलेले ध्येयापर्यंत जाण्यासाठी प्रयत्न केले आणि प्रयत्न करुन यशात रूपांतर झाले आहे असे त्या



म्हणाल्या यावेळी प्रमुख मान्यवरांचे हस्ते परमेश्वर महदेव तांदळे यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व फटाक्याचे आतषबाजी करण्यात आली कार्यक्रम प्रसंगी युवा उद्योजक ह, भ प ,भागचंद झांजे ,खाडे सर ,पत्रकार सुरेश कांबळे ,भगवान दराडे,अशोक तांदळे सर,रमेश मरकड, पवार सर कॅप्टन तळेकर आदींची समयोचीत भाषणे झाली या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य रावसाहेब बाबा लोखंडे,भगवान दराडे पाथर्डी तालुका शिवसेना अध्यक्ष ,सरपंच पोपट शेंकडे , माजी सरपंच बबन आण्ण तळेकर, मुरलीधर शेकडे आमटे सर, बिसेन साहेब ,दिलीप तांदळे ,कवी युवराज वायबसे, नितीन घुले ,अशोक तांदळे सर, हरिभाऊ तांदळे, आदी मान्यवर उपस्थित होते पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले परीक्षेसाठी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मी फार खर्च शेतीमध्ये शिक्षण घेतले मी स्वतः हाताने स्वयंपाक करून शिक्षण घेतले पण हार मानले नाही पंचवीस वर्ष माझ्या आई-वडिलांनी ऊस तोडून व माझा भाऊ यानी मला पाठबळ देऊन मी आजही यशापर्यंत पोहोचलो आहे शेवटी यश प्राप्त झाले असे ते आपले मनोगत करताना म्हणाले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खाडे सर यांनी केले

## नायगांवचा अभिजित मुजमुले याची सामान्य कुटुंबातून यशाला गवसणी

### भूमी अभिलेख विभागात अभिलेखापालपदी निवड

केज (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मौजे नायगांव येथील अभिजित महादेव मुजमुले याची भूमी अभिलेख विभागात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल या पदासाठी निवड झाली आहे.त्याच्या या निवडी बद्दल सर्वच स्तरामधून त्यांच्या वर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिजित मुळातच होतकरु असल्याने स्पर्धा परीक्षेत सातत्य राखत शासकीय सेवेचे त्याचे



स्वप्न साकार झाले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन सर्वसामान्य कुटुंबातून मेहनतीने हे यश मिळवले. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर पॉलीटेकनिकचे शिक्षण योगेश्वरी कॉलेज अंबाजोगाई आणि सिव्हिल इंजिनियरिंग-बी टेक हे अहमदपूर येथे पुर्ण झाले.मात्र शिक्षण पुर्ण झाले.परंतु मनातील शासकीय सेवेचे स्वप्न शांत बसू देत नव्हते.त्यामुळे २०२३ पासून स्पर्धा परीक्षे चा अभ्यास सुरु केला. त्यांनी अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द न सोडता सातत्यपूर्ण अभ्यास करत भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत अभिलेखापाल पदी त्यांची निवड झाली. अभिजीतने हे यश आपल्या अभ्यासातील सातत्य,चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट,नातेवाईक, मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छां चा वर्षाव होत आहे.ते पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांचे लहान बंधू आहेत.

## केवळ बुकलेट वाचून आ.आजबे यांनी सबस्टेशन्स आणि ट्रान्सफार्मर मंजुरी बाबत जनतेची दिशाभूल केली

### जनतेची माफी मागावी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचा आरोप

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विजेचा प्रश्न मार्गी लागला ९ सब स्टेशन्स आणि६६८ ट्रांसफार्मर मंजूर केल्याचा आव आ.बाळासाहेब आजबे यांनी आणला ही जनतेची शुद्ध फसवणूक आणि दिशाभूल असून आपण कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे त्याचे पत्र दि..११नोव्हेबर २०२३ रोजी दिलेले आहे आणि त्याचा पाठपुरावा केलेला आहे मात्र जी योजना अद्याप केंद्र शासनाने मंजूर केलेली नाही केवळ त्याचे बुकलेट मधील नावे वाचून मंजुरीच्या बातम्या दिल्यामुळे मला त्यांच्या बुद्धीची किंवा येते त्यांनी जनतेचे माफी मागावी असा पलटवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला,

याबाबत पुढे बोलताना ते म्हणाले ,की

दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी आष्टी मतदार संघाचे आमदारांनी ९ वीज सबस्टेशन्स आणि ६६८ ट्रान्सफॉर्मर्स मंजूर करून विजेचा प्रश्न सोडवला अशा बातम्या आणि वर्तमानपत्रात जाहिराती देऊन आणि सोशल मीडियावर बातम्या पसरवून..सत्कार करून घेऊन स्वतःची बडवून घेतली आहे..

हे सर्व पाहता मला त्यांच्या बुद्धीची कीव येते.. हे म्हणजे उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग अशी त्यांची अवस्था



झाल्याची दिसून येते,

आष्टी पाटोदा, शिरूर कासार तालुक्यातील विजेचा गंभीर प्रश्न पाहता आपण सुधारित वितरण क्षेत्र योजना (आर डी एस एस ) अंतर्गत या सर्व कामांना मंजुरी मिळावी यासाठी आपण प्रस्ताव दाखल करून त्यासाठी पत्र दिलेले आहे यामध्ये काही कच्चा आराखडा होता त्यामध्ये काही बदल आवश्यक होते.दादेगाव, पारोडी, बीडसांगवी, मातकुळी, कोयाळ, जामगाव, अंभोरा,

पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका, पारगाव घुमरा सौताडा,

शिरूर कासार तालुक्यातील शिरूर कासार इतकेच नक्की होतील एवढे मी सुचवले होते त्यापैकी दादेगाव हे पूर्वीच्याच महावितरण योजनेत मंजूर होते मात्र जागे अभावी ते राहिले होते पारगाव घुमरा या ठिकाणच्या शेतकऱ्यांना सन २०१४ सालीच भूसंपादनाचे पैसे दिलेले आहेत या ९ वीज उपकेंद्रांचा प्रस्ताव पुढे पाठवला तसेच सद्यस्थितीमध्ये ५ एम व्ही ए क्षमतेच्या पावर ट्रांसफार्मर सह आणखी ५ ट्रांसफार्मर आष्टी, पोखरी, शिराळ, धानोरा, दौलावडगाव, टाकळी अमिया पाटोदा तालुक्यातील रोहतवाडी आणि शिरूर तालुक्यासाठी फिडरवे तयार करणे यासह सद्यस्थितीत१७५ ठिकाणी ६३ क्षमतेच्या ऐवजी १०० क्षमतेचे ट्रांसफार्मर बसवणे ३३/११ सब स्टेशन साठी एकूण ३८ किलोमीटर वीज वाहिनी तयार करणे, या कामांसाठी कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांच्याकडे पत्र व्यवहार केला आहे मात्र विद्यमान आमदारांनी कशाचीही शहानिशा न करतात केवळ आमदारांना देण्यात येणाऱ्या बुकलेटमध्ये नावे वाचली आणि मंजुरी मिळाल्या बाबतच्या बातम्या दिल्या आणि जाहिराती प्रसिद्ध करून स्वतःचीच बडवून घेतली



शहरातील समस्या संदर्भात डॉ.ज्योती मेटे यांनी घेतली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट

बीड (प्रतिनिधी) कला बीड शहरतिल समस्या संदर्भात मुख्याधिकारी यांना निवेदन देत बीड शहरातील समस्या सोडवण्याची मागणी डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. आज त्यांनी या विषयी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेत नागरिकांच्या समस्या मांडल्या आणि नगर पालिका प्रशासनाची नाकर्तेपणाची जाणीव करून दिली. या प्रसंगी अनिल घुमरे , सुहास पाटील, नवनाथ प्रभाळे,मनोज जाधव, बाळासाहेब मस्के,प्रा.पंडित शेंडगे,नामदेव धांडे, सुनील थोरात, हरीश शिंदे आदी. उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या जाणून घेऊन त्या समस्यांचे निराकरण करणे हे नगरपालिकेचे संविधानिक जबाबदारी असून बीड नगरपालिका यामध्ये सपशेल अपयशी ठरल्याचे दिसत आहे. या समस्या ऐकून घेण्यासाठी नगर पालिका प्रशासन आणि मुख्याधिकारी यांना वेळ नाही . तेव्हा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनीच या प्रश्र्नी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT


पहचान
बताने की
जरुरत नही..
लोग हमे
नाम से ही
पहचान
जाते है..!!
आपणास या
जन्मदिनी
दिर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा..!
©SHIVSANGHARSH GRAPHIC | 9022779960
• शुभेच्छुकः - संपादक दिपक थोरात
सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ महाराष्ट्र आरंभ न्यूज लाईव्ह.